**मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचा संदेश**

# -: २०१८ नवी संधी-नवी आव्हाने :-

प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,

अनेक चांगल्या अनुभवांनी अधोरेखित होऊन गेलेले एक वर्ष नुकतेच संपले आणि प्रगतीची नवी संधी व आव्हाने देणारे एक नवे वर्ष सुरु झाले. आपण सर्वांनी गेल्या वर्षी आपल्या जबाबदारी पार पाडली आणि कंपनीला अधिक कार्यक्षम बनविण्यास साथ दिली तशीच या नव्या वर्षात मिळेल, याची मला पूर्ण खात्री आहे.

आपल्या सर्वांना नवीन वर्षाच्या मन:पूर्वक शुभेच्छा. आपणा सर्वांना चांगले आरोग्य, मनशांती आणि आनंद लाभो. उत्साही, आनंदी आणि कार्यमग्न राहिले की या गोष्टी आपोआप मिळतात, असा अनुभव आपल्याला आलाच असेल. जो वर्तमानात सर्व काळजी घेतो, त्याला भविष्याची काळजी करावी लागत नाही. याचा अर्थ आपले वर्तमानच भविष्य घडवत असते.

गेल्या वर्षाचा कार्याचा आढावा घेतला असता असे दिसते की, गेल्या वर्षी विजेच्या मागणीमध्ये नगण्य वाढ झाली आहे. त्यामुळे महापारेषण कंपनीपुढे आपल्या पारेषण प्रणालीच्या वाढीसंदर्भात तसे मोठे आव्हान नव्हते. अशा वेळी आपल्या प्रस्थापित पारेषण प्रणालीत सुधारणा करण्याची संधी मिळाली. त्यामुळे अनेक प्रलंबित कामे मार्गी लागली. वीज यंत्रणा आणि प्रणालीचे सक्षमीकरण करणे ही काळाची गरज होती. त्यातील अनेक गोष्टी यावर्षी पूर्ण करता आल्या. यामध्ये राज्य पारेषण उपक्रम, अभिकल्प, कंत्राटे व अनुश्रावक, संचलन व सुव्यवस्था, चाचणी, स्वयंचलन आणि संचार विभाग, मानव संसाधन, वित्त, राज्य भार प्रेषण केंद्र, स्थापत्य, ईआरपी, सुरक्षा, कंपनी सचिव, दक्षता, विधी या विभागांनी आपल्या कार्यप्रणालीमध्ये सुधारणा करून महत्त्वाची भूमिका बजावली.

यामध्ये राज्य पारेषण उपक्रम विभागाने दुर्गम भागांसाठी योजना केल्या. नंदुरबार, धडगाव, जव्हार, नागभीड, देवरी, साकोली या दुर्गम आणि आदिवासी भागांमध्ये उपकेंद्रे करण्याचे पंचवार्षिक आराखड्यात अंतर्भूत केले आहे व प्रकल्प योजना विभागाने त्यांस बोर्डाची मान्यता घेतली. अभिकल्प, कंत्राटे आणि अनुश्रावक विभागाने प्रलंबित व अपूर्ण कामे मार्गी लावली. त्यामध्ये उपकेंद्रे, संलग्न वाहिन्या ही कामे पूर्णत्वास नेली. अंजनगाव, मालेगाव, कृष्णूर, सेनगाव येथील प्रकल्प मार्गी लागले. यासाठी त्यांनी संबंधित जिल्हाधिकारी व प्रशासनाशी सातत्याने समन्वय साधला. संचलन व सुव्यवस्था विभागाने Reactive Power Compensation व क्षमता वाढ योजनेची वेळेत कार्यवाही केली. स्वयंचलन आणि संचार विभागाने ऑटोमेशन स्कीम, स्काडा सिस्टीम सर्व्हिसमध्ये घेणे, कम्युनिकेशनची व्यवस्था करणे, मोठ्या धर्तीवर NTAMC सेंटर करण्यासाठी भर दिला आहे. मानव संसाधन विभागाने तांत्रिक विभागाच्या कर्मचारी मानांकनाच्या आढाव्याचे कार्य पूर्ण केले. वित्त विभागासाठी कंपनीच्या उत्पन्नात घट झाल्यामुळे हे वर्ष थोडंसं आव्हानात्मक आणि अडचणीचे होते. तरीही या विभागाने त्यावर मात केली. राज्य भार पारेषण केंद्राने उपकेंद्रांत उपकरणे

बसविली.उपकेंद्रातून SLDC पर्यंत डाटा कम्युनिकेशन लाईन बसविली. डाटा आल्यानंतर SLDC च्या स्काडा प्रणालीमध्ये या डाटांना अंतर्भुत करण्याचे काम गतीने केले.

स्थापत्य विभागाने STU प्लॅनप्रमाणे MBR मंजुरीनुसार जमिनी अधिग्रहण करण्याचे काम वेळेवर करण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. पुणे, कळवा येथे नवीन प्रशासकीय इमारत उभारणीसाठी मान्यता घेतली आहे. तसेच बाभळेश्वर, जेजुरी, लोणावळा येथील प्रशिक्षण केंद्राच्या इमारतींचे काम लवकरच हाती घेण्यात येणार आहे. ईआरपी, सुरक्षा, कंपनी सचिव, दक्षता, विधी विभागांनीही मोलाची कामगिरी बजावली.

सांघिक कार्यालय हे तर महापारेषणचे हृदय (हार्ट) आहे. काम आणि कामांचे अनुकरण याबाबत या कार्यालयाने उत्तम उदाहरण घालून दिले पाहिजे. हे कार्यालय मानकीकरण व सुस्पष्ट मार्गदर्शक तसेच कार्यासंदर्भातील नामांकने क्षेत्रीय कार्यालयाकरिता तयार करते. उत्पादकता व परिणाम, वेळेवर प्रस्तावांची मंजुरी यामध्ये प्रत्येकांची भूमिका महत्त्वाची आहे. ही भूमिका प्रत्येकाने मान्य केल्यानेच आपण हा टप्पा गाठू शकलो.

कोणत्याही कामात तीन गोष्टींना अतिशय महत्त्व असते, त्यातील पहिली म्हणजे जीवनामध्ये निरंतर सुधारणा अत्यावश्यक असते. मला वाटते आपण ती सुधारणा केली आहे आणि यापुढेही करत राहू. दुसरे म्हणजे कायम नवीन शिकणं आवश्यक असते. यापासून तर जगात कोणाचीच सुटका नाही. आपण आता माहितीचे महाजाल आणि ज्ञानी समाजात राहत आहोत. कंपनीच्या जीवनात त्याला जेवढे महत्त्व आहे, तेवढेच ते प्रत्येकाच्या जीवनात आहे. खरे म्हणजे कंपनी जशी या बदलाला अंगीकृत करते, तसे प्रयत्न प्रत्येकाने केले पाहिजेत. तिसरी तेवढीच महत्त्वाची गोष्ट म्हणजे सकारात्मकता. आपल्या जीवनात सकारात्मकतेला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. आपण चांगल्या कामाचा ठसा ठेवणार आहोत, असे प्रत्येकाला वाटले की सामुहिक कामात त्याचे प्रतिबिंब उमटायला वेळ लागत नाही.

असा एक ठसा आपण सर्वांनी गेल्या वर्षी उमटवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे नव्या वर्षाच्या आपल्याकडून असलेल्या अपेक्षा आणखी उंचावल्या आहेत. त्या अपेक्षा ही नवी आव्हाने आहेत, असे आपण म्हणूयात आणि त्या आव्हानाचे स्वागत करूया. हे काम दिलेल्या मुदतीत आणि वेळेवर व्हावे, यासाठी सर्व विभाग समन्वय साधून काम करत आहेत. यात आपण कोठे मागे राहणार नाहीत, हे आवर्जून पाहिले पाहिजे. मला खात्री आहे, की या आव्हानावर आपण सहजपणे मात करू. आपल्या मनात असलेल्या इच्छा पूर्ण होवोत आणि आपली स्वप्ने साकार होवोत, हीच सदिच्छा.

शुभेच्छांसह..!

**-राजीव कुमार मित्तल**

**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**

**संक्षिप्त मुद्दे**

**-सर्व विभागांचा घेतला आढावा**

**-प्रलंबित कामे मार्गी, नवीन आव्हाने स्वीकारा**

**-कार्यालयीन सुधारणा आवश्यक**

**-कायम नवीन शिकत राहा**

**-सकारात्मकता असायला हवी**


महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
महापारेषण



